RNI No. MAHBIL/2009/37831

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-ब

वर्ष ५, अंक १४६] शुक्रवार, नोव्हेंबर १५, २०१९/कार्तिक २४, शके १९४१ [पृष्ठे ४, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक ३९५**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**महसूल व वन विभाग**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२ दिनांक १५ नोव्हेंबर, २०१९.

**आदेश**

**महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम.**

क्रमांक मुद्रांक-२०१८/१६८०/प्र.क्र. १५६/म-१(धोरण).—ज्याअर्थी, बृहन्मुंबई विकास नियंत्रण नियमावलीतील विनियम ३३ (७) किंवा ३३ (९) खाली बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या (यात यापुढे जिचा निर्देश " बृहन्मुंबई मनपा " असा करण्यात आला आहे) मालकीच्या जुन्या इमारती किंवा चाळी यांच्या पुनर्विकास प्रक्रियेस चालना देण्यासाठी, महाराष्ट्र शासनाने, लोकहितास्तव बृहन्मुंबई मनपाच्या मालकीच्या जुन्या इमारती किंवा चाळी यांच्या पुनर्विकासाशी संबंधित त्रिपक्षीय करारनाम्याच्या संलेखावर महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम (१९५८ चा ६०) (यात यापुढे ज्याचा निर्देश " उक्त अधिनियम " असा करण्यात आला आहे) यास जोडलेल्या अनुसूची-१ च्या अनुच्छेद ५ च्या खंड (ग-अ) अन्वये अन्यथा आकारणीयोग्य असलेले मुद्रांक शुल्क रुपये १००० (रुपये एक हजार फक्त) पर्यंत कमी करण्याचे ठरविले होते;

आणि ज्याअर्थी, त्यानुसार, उक्त अधिनियमाच्या कलम ९ च्या खंड (अ) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन, महाराष्ट्र शासनाने, लोकहितास्तव तसे करणे आवश्यक असल्याबद्दल त्याची खात्री पटल्यामुळे, शासन आदेश, महसूल व वन विभाग, क्रमांक मुद्रांक-२०१८/१६८०/प्र.क्र.५१६/म-१ (धोरण), दिनांक २० जून, २०१९ (यात यापुढे ज्याचा निर्देश " उक्त आदेश " असा करण्यात आला आहे) द्वारे, 'बृहन्मुंबई मनपा यांच्या मालकीच्या जुन्या इमारती किंवा चाळी यांच्या रहिवाशी तथा भोगवटादारांची नोंदणीकृत सहकारी गृहनिर्माण संस्था (यात यापुढे जिचा निर्देश " नोंदणीकृत स. गृ. संस्था " असा करण्यात आला आहे), उक्त नोंदणीकृत स. गृ. संस्थेने नियुक्त केलेला विकासक आणि बृहन्मुंबई मनपा', यांच्यामध्ये निष्पादित केलेल्या किंवा निष्पादित करण्यात येत असलेल्या तथा येणाऱ्या त्रिपक्षीय करारावर, उक्त अधिनियमास जोडलेल्या अनुसूची-१ च्या अनुच्छेद ५ च्या खंड (ग-अ) अन्वये अन्यथा आकारणीयोग्य असलेले मुद्रांक शुल्क, त्या आदेशात विनिर्दिष्ट केलेल्या शर्तींची पूर्तता करण्याच्या अधीन राहून, कमी करुन ते रुपये १००० (रुपये एक हजार फक्त) इतके निश्चित केले आहे ;

आणि ज्याअर्थी, बृहन्मुंबई विकास नियंत्रण नियमावलीच्या विनियम ३३(७) किंवा ३३(९) खाली बृहन्मुंबई मनपाच्या मालकीच्या जुन्या इमारती किंवा चाळी यांच्या पुनर्विकासाच्या संबंधात " विकासक व बृहन्मुंबई मनपा " यांच्यामध्ये निष्पादित केलेल्या किंवा निष्पादित करण्यात येत असलेल्या तथा येणाऱ्या द्विपक्षीय करारावर देखील रुपये १००० इतके मुद्रांक शुल्क निश्चित करण्यासाठी उक्त आदेशामध्ये सुधारणा करण्याची विनंती करण्यात आली आहे ;

त्याअर्थी आता, उक्त अधिनियमाच्या कलम ९ च्या खंड (अ) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन, महाराष्ट्र शासन, याद्वारे उक्त आदेशामध्ये पुढीलप्रमाणे सुधारणा करीत आहे :—

उक्त आदेशामध्ये,—

(क) उद्देशिकेच्या पहिल्या परिच्छेदामध्ये, " त्रिपक्षिय ", या मजकुराऐवजी, " त्रिपक्षिय किंवा द्विपक्षिय ", हा मजकूर दाखल करण्यात येत आहे;

(ख) उद्देशिकेच्या दुसऱ्या परिच्छेदामध्ये, " त्रिपक्षिय कराराच्या संलेखावर ", या मजकुरानंतर, " किंवा, बृहन्मुंबई मनपा आणि, बृहन्मुंबई विकास नियंत्रण नियमावलीच्या विनियम ३३(७) किंवा ३३(९) अन्वये उक्त नोंदणीकृत स. गृ. संस्थेने किंवा बृहन्मुंबई मनपाने बृहन्मुंबई मनपाच्या मालकीच्या जुन्या इमारतींचा किंवा चाळींचा पुनर्विकास करण्यासाठी नियुक्त केलला विकासक यांच्यामध्ये निष्पादित केलेल्या किंवा निष्पादित करण्यात येत असलेल्या द्विपक्षीय करारावर " हा मजकूर समाविष्ट करण्यात येत आहे;

(ग) शर्त (२) मधील, " त्रिपक्षिय ", या मजकुराऐवजी, " त्रिपक्षिय किंवा द्विपक्षिय " हा मजकूर दाखल करण्यात येत आहे;

(घ) शर्त (६) मधील " त्रिपक्षिय ", या मजकुराऐवजी, " त्रिपक्षिय किंवा द्विपक्षिय " हा मजकूर दाखल करण्यात येत आहे;

(ङ) शर्त (७) मधील, " त्रिपक्षिय ", या मजकुराऐवजी, " त्रिपक्षिय किंवा द्विपक्षिय " हा मजकूर दाखल करण्यात येत आहे;

(च) शर्त (८) मधील, " त्रिपक्षिय ", या मजकुराऐवजी, " त्रिपक्षिय किंवा द्विपक्षिय " हा मजकूर दाखल करण्यात येत आहे;

(छ) शर्त (८) नंतर, पुढील नवीन अटी तथा शर्ती जादा दाखल करण्यात येत आहेत :—

(९) द्विपक्षिय करार हा, 'बृहन्मुंबई मनपाच्या मालकीच्या जुन्या इमारती किंवा चाळी यांचा पुनर्विकासासाठी बृहन्मुंबई मनपा आणि बृहन्मुंबई विकास नियंत्रण नियमावलीच्या विनियम ३३(७) किंवा ३३ (९) खाली उक्त नोंदणीकृत स. गृ. संस्थेने किंवा बृहन्मुंबई मनपाने बृहन्मुंबई मनपाच्या मालकीच्या जुन्या इमारतींचा किंवा चाळींचा पुनर्विकास करण्यासाठी नियुक्त केलेला विकासक यांच्यामध्ये निष्पादित करण्यात आलेला असावा किंवा निष्पादित करण्यात यावा.

(१०) बृहन्मुंबई मनपाने निष्पादित केलेल्या संलेखांखेरीज साध्या कागदावर निष्पादित केलेले अमुद्रांकित संलेख हे, या आदेशाखालील कोणत्याही लाभाकरिता पात्र असणार नाहीत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

**प्रितमकुमार व. जावळे,**
शासनाचे कार्यासन अधिकारी.

## REVENUE AND FORESTS DEPARTMENT

Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mumbai 400 032, dated the 15th November 2019.

### ORDER

MAHARASHTRA STAMP ACT.

No.Mudrank.2018/1680/C.R.No.156/M-1 (Dhoran).—Whereas, in order to promote the process of re-development of old buildings or chawls belonging to the Municipal Corporation of Brihan Mumbai (hereinafter referred to as "the MCGM"), under regulation 33(7) or 33(9) of the Development Control Regulations for Brihan Mumbai, the Government of Maharashtra, in the public interest, had decided to reduce the stamp duty to Rs.1000/-(Rupees One Thousand only), as otherwise chargeable under clause *(g-a)* of article 5 of Schedule-I appended to the Maharashtra Stamp Act (LX of 1958), (hereinafter referred to as "the said Act"), on the instrument of Tripartite Agreement in respect of re-development of the old buildings or chawls owned by MCGM ;

And whereas, accordingly, in exercise of the powers conferred by clause *(a)* of section 9 of the said Act, the Government of Maharashtra, being satisfied that it was necessary to do so in the public interest, had *vide* Government Order, Revenue and Forests Department, No. Mudrank. 2018/1680/C.R.No.156/M-1(Dhoran), dated the 20th June 2019 (hereinafter referred to as "the said Order"), reduced and fixed the stamp duty to Rupees 1000/-(Rupees One Thousand only), as otherwise chargeable under clause *(g-a)* of article 5 of Schedule-I appended to the said Act, on the Tripartite Agreement, executed or being executed in between "the Registered Co-operative Housing Society of occupants of the MCGM owned old buildings or chawls (hereinafter referred to as "the Registered CHS"), the developer appointed by the said Registered CHS and the MCGM", subject to fulfilment of the conditions specified therein ;

And whereas, a request has been made to amend the said Order for fixing the stamp duty as Rs.1000/- on the Bipartite Agreement, executed or being executed in between "the developer and the MCGM", in respect of re-development of the MCGM owned old buildings or chawls under regulation 33(7) or 33(9) of the Development Control Regulations for Brihan Mumbai ;

NOW, THEREFORE, in exercise of the powers conferred by clause *(a)* of section 9 of the said Act, the Government of Maharashtra hereby amends the said Order, as follows, namely :—

In the said Order,—

*(a)* in the first paragraph of the preamble, for the word, "Tripartite", the words, "Tripartite or Bipartite", shall be Substituted;

*(b)* in the second paragraph of the preamble, after the words/ figures and letters, "the said Registered CHS and the MCGM", the words/ figures and letters, "or on the Bipartite Agreement, executed or being executed between the MCGM and the developer appointed for the

re-development of the MCGM owned old buildings or chawls by the said Registered CHS or the MCGM under regulation 33(7) or 33(9) of the Development Control Regulations of Brihan Mumbai", shall be inserted ;

*(c)* in Condition (2), for the word, "Tripartite", the words, "Tripartite or Bipartite", shall be Substituted ;

*(d)* in Condition (6), for the word, "Tripartite", the words, "Tripartite or Bipartite", shall be Substituted ;

*(e)* in Condition (7), for the word, "Tripartite", the words, "Tripartite or Bipartite", shall be Substituted ;

*(f)* in Condition (8), for the word, "Tripartite", the words, "Tripartite or Bipartite", shall be Substituted ;

*(g)* after Condition (8) the following new Conditions shall be added, namely :—

"(9) The Bipartite Agreement should have been executed or should be executed in between the MCGM and the developer appointed for the re-development of the MCGM owned old buildings or chawls by the said Registered CHS or the MCGM under regulation 33(7) or 33(9) of the Development Control Regulations of Brihan Mumbai.

(10) Unstamped instruments which are executed on plain papers shall not be eligible for any benefit under this order; except for the instruments executed by the MCGM."

By order and in the name of the Governor of Maharashtra,

PRITAMKUMAR V. JAWALE,
Desk Officer to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR DR. NAMDEO KONDAJI BHOSALE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 EDITOR : DIRECTOR DR. NAMDEO KONDAJI BHOSALE.